प्रकरण ३

तर्क, बुध्दिवान, वैज्ञानिक दृष्टिकोन इत्यादिच्या आधारे विश्वाचे स्पष्टीकरण ज्यावेळी मिळत नव्हते, तेंव्हा कल्पना शक्तीच्याद्वारे जगाचे, विश्वाचे स्पष्टीकरण देण्याचे कार्य पुराण कथांनी केले. पुराण कथामध्ये कल्पना शक्तीचे विश्व अतिशय ताणले गेले आहे. आदिमानव ज्यावेळी संस्कृतीच्या बालयावस्थेत होता, त्यावेळी तो विश्वातील घटनाचा तो बालमनानेच विचार करत होता. वर्तमानकाळ अनुभवतांना भूतकाळात जावे लागते.

नदीचा उगम अगदी लहान असतो. या इवल्याशा झऱ्याला पुढे पुढे इतर अनेक ओढे, नाले,प्रवाह मिळतात आणि मग तोच झरा नदी म्हणून वाहू लागतो. एखाद्या लहान मोठया उद्दिष्टांकडे धावणारे रस्ते हे प्रारंभी अगदी छोटे असतात. त्यावरुन जेमतेम एक्केकटा माणूस पायानी पावले टाकीत जाईल पण या ' पाऊलवाटा ' च पुढे रुळतात. त्याच वाटेचे मार्ग, रस्ते राजमार्ग होतात, पण त्यामुळे 'पाऊलवाटा' ची किंमत व महत्व कमी होत नाही. भारतीय जीवनात आज कितीतरी उंच उंच कार्य डोलाने उभी आहेत. सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, धार्मिक, शैक्षणिक,

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

संशोधनात्मक स्वरुपाच्या कितीतरी उद्योगांनी आपली बाल्य दशा ओलांडली. (१)

बाल्य दशा ओलांडली असली तरी त्याच पाऊल वाटेवर चालत असताना मागोवा घ्यावाच लागतो. आजच्या या देशात संस्कृतीचे पाळेमुळे किती खोल रुजली ? हे पाहणं मी माझे कर्तव्य समजले म्हणून आदिपुराणातील समाजदर्शनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

भारतीय विद्वानांच्या मानाने पाश्चात्य पंडितानी, भारतीय, प्राचीन जैन, वेद वांड्मयावर अपरंपार लिखाण केले आहे. पंडित केतकरानी, पन्नालाल जैन यांनीवेद व आदिपुराणाचा सूक्ष्म व सखोल अभ्यास केला आहे.

श्री केतकर हे स्वतः समाजशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश ' या ज्ञानकोशात समाजशास्त्रीय ज्ञानाचे दर्शन ठायी ठायी घडविले आहे. (२)

विश्वात आणि मानवी समाजात कालतत्वे भरले आहे. जैन शासनाच्या मतानुसार अनन्तरुप, अतीतकाळ, अनंत गुणित, अनागत काळ समायादिक वर्तमान काळ असे काळाचे तीन प्रकार करण्यात आले आहेत.

व्यवहार काळाचे 'उत्सर्पिणी ' व अवसर्पिणी असे दोन भाग करण्यात येतात. या दोन्हींना मिळून कल्पकाळ म्हणतात. या दोन्हीचे मिळून वीस

कोटी कोटी सागर प्रमाण म्हणजे एक कल्पकाळ होय. सुषमासुषमा, सुषमा, सुषमादु:खमा, दु:षमा-सुषमा, दु:षमा, आतिदु:षमा हे अवसर्पिणी काळाचे सहा भेद आहेत. त्याच्याबरोबर उलट अति दुषमा, दु:षमा , दु:षमा-सुषमा, सुषमादुषमा, सुषमा, सुषमा दुषमाहे उत्सर्पिणी काळाचे सहा विभाग आहेत. (३)

भगनवान ऋषभदेव अवसर्पिणी काळाच्या चोवीस तीर्थंकरात आद्य तीर्थंकर होते. (४)

भ. ऋषभेदवाच्या उपदेशावरुन समाज निर्मीती झाली. मानवाच्या निर्मीतीमध्ये पुराणाचे महत्व आहे. मॅक्समुलरच्या मते पुराणाचा सबंध वेदपूर्वकाळातील अवैदीक संस्कृतीशी पोहचतो हे मॅक्समुलरने जीवनाच्या अखेरीस आत्मचरिञात वेद सर्वात जुना ग्रंथ असल्याचे मांडले आहे (My Autobiography a fragment By Maxmular P. १८८-१८९ and २७८) (५)

सिंधू संस्कृतीचा काळ इ.स. पू. ३००० च्या सुमाराचा आहे, हे आता इतिहास तज्ञांनी उत्खनन झाल्यावर कालनिर्णय पध्दत वापरुन निश्चित केले आहे. ऋग्वेदातील संदर्भावरुन 'ऋग्वेद' सिंधू संस्कृती सिंधू संस्कृतीस सककालीन होता, हे स्पष्ट केले आहे. (६)

१९२२-२७ च्या काळात मोहोंजोदडो व हडप्पा येथे उत्खनन झाले तेथे मिळालेल्या अवशेषात भगवान ऋषभनाथांच्या कार्योत्सर्ग अवस्थेतील

काही दिगंबर प्रतिमा आहेत. तर एका वैशिष्ठयेपूर्ण प्रतिमेवर (सील क्रं. ६२०/१९२(-२९) कार्योत्सर्ग अवस्थेतील भगवान ऋषभनाथांच्या शिरोभागी रत्नत्रयदर्शक व समोर नतमस्तक झालेले भरत चक्रवर्ती त्यांच्या मागे भगवंताचे लांछन चिन्ह ऋषभ (वृषभ किंवा बैल)खालच्या भागात भरताचे सात मंत्रिगण दाखवण्यात आले आहेत. तसचे आणखी एका अनुशेषावर (सील क्रं.४४९) 'जिन इसरह' असा प्राकृत भाषेतील लेख आहे. याशिवाय मंगलमय आशा स्वस्तिक चिन्हांचा वापर येथे सर्वत्र दिसून आला. यावरुन जैन संस्कृती काल इ.स. पूर्व ३००० असल्याचे स्पष्ट होते. (७)

पुराण साहित्य आणि चरित्र साहित्य, पुराण साहित्य आणि इतिहास ही एकमेकांच्या जवळची असतात, फारसा फरक नसतो. कथा काव्यांप्रमाणे जैन मुनींनी महापुरुषांच्या चरित्राची तथा पुराणाची रचना केली. जेंव्हा ब्राम्हणांनी पुराण ग्रंथाची रचना केली. व रामायण, महाभारताची लोकप्रियता वाढू लागली, त्याचवेळी जैन विद्वानांनी राम ,कृष्ण व विविध तिर्थंकर यांच्या जीवन चरित्राविषयी लिखाणास प्रारंभ केला. त्रेसष्ट शलाका पुरुष चरित्रांमध्ये चोवीस तिर्थंकर, बारा चक्रवर्ती, नऊ वासुदेव, नऊ बलदेव, नऊ प्रतिवासुदेव यांचा समावेश केला आहे. कांही स्वंतत्र पुराण ग्रंथाची रचना झाली आहे. त्यात आदिनाथ चरित्र, सुमतिनाथ

चरित, चंद्रप्रभास्वाती चरिञ, वासु पुज्य स्वामी चरिञ, शांतिनाथ चरिञ यांचा समावेश करता येईल. (८)

संस्कृत जैन दिगंबर पुराण साहित्यामध्ये महापुराणाचा तिसरा क्रंमाक लागतो. महापुराणाचे दोन खंड आहेत. प्रथम खंडाला 'आदिपुराण' किंवा पुर्व पुराण असे म्हणतात. तर दुसऱ्या खंडाला 'उत्तर पुराण ' म्हटले आहे.(९)

जैन मान्यते प्रमाणे कालचक्राच्या पुर्वोक्त सहा भागांपैकी पहिल्या दुसऱ्या भागात कोणताही धर्म अगर राजा किंवा समाज असत नाही. एका कुटूंबात पती व पत्नी हे युगल असते. आजुबाजूला कल्पवृक्ष असतात. त्यापासून आवश्यक पदार्थ मिळत. मरणाच्या अगोदर एका पुञास व मुलीस जन्म देऊन जात. बालके अंगठा चोकूनच मोठे होत. अशी परिस्थिती तिसऱ्या कालापर्यंत कायम होती. त्याला भोग भूमीचा काल म्हणतात.

माणसाचे जीवन त्या काळात भोगप्रधान होते. भोगभूमीत जीवन निर्वाहासाठी काहीही उद्योग करावा लागत नाही. कल्पवृक्षापासून जीवन आवश्यक वस्तू मिळणे जेंव्हा कठीण होत जाते. तेव्हा परस्परात भांडणे होतात. तेंव्हा १४ मनूंची उत्पती होते. त्यातील ५ वा मनू वृक्षांची मर्यादा नेमून देतो, तरीही भांडणे होतात. ७ व्या मनूने पशूकडून कसे कामे करुन

घ्यावीत घोडयावर चढणे वगैरे शिकवले. १२ व्या मनूने पूल, नावा वगैरेच्या साहयाने पैलतीरास जाण्याचे शिक्षण दिले. (१०)

१४ व्या शतकात मनूचे नाव नाभीराज होते. त्यांच्या पत्नीचे नाव मरुदेवी होते. यांच्यापासून ऋषभदेव जन्मले.

१४ व्या मनूने अडीअडचणी दूर करीत सामाजीक व्यवस्थेचा पाया घातला. लौकीक शास्त्र व लोक व्यवहार यांचे शिक्षण ऋषभदेवानीच दिले व अंहिसा मूलक धर्माची स्थापना केली. (११)

भारताचे मूलनिवासी जैन होते की हिंदू होते हा वाद येथे स्पष्ट करावयाचा नसून जैन हा वेगळा धर्म किंवा जात नाही, तर जैन आचार परंपरा आहे. जैन धर्म मूलतः आत्मधर्म आहे. सर्व जीव समान मानणे हे मूख्य तत्व आहे. जैन आदर्श किंवा साधन पध्दती प्राग्वैदीक भारतातीत तत्कालीन सभ्य समजल्या जाणाऱ्या द्रविडांमध्ये विकसित होऊन अन्यत्रही व्याप्त झाली होती. जैन धर्म साऱ्या विश्वात धार्मिक व मानवी आत्मविकासाचा मूल स्त्रोत होय. यावरुन असेही म्हणता येईल की, मानव समाजाच्या विकासाची प्रतिष्ठा यावर आधारित होती. (१२)

सृष्टीच्या आरंभापासून इतिहास सांगणाऱ्या जैन वैदीक, पुराणाबरोबर कुराणाविषयी अर्थात इस्लाम धर्माविषयीही विचार केल्यास सुदीत जैन यानी सन्मतीत लिहिल्याप्रमाणे जैन धर्म व संस्कृतीचे

विश्वव्यापीत्व या शिर्षकाच्या लेखातील विचारही लक्षात घेण्यासारखा आहे. इस्लामचे जन्मक्षेत्र मक्का मदीना येथे सुध्दा जैनधर्माचा प्रभाव दिसून आला. तेथील आचारसंहितेचे विधान आहेत ते जैन धर्माशी संगत आहेत. कुराणामधील वाक्य ' काऽन न्नाडसू उम्मतत्वा हिदतन ' , या वाक्यावरुन सर्व लोकांचा एकच धर्म होता 'इस्लाम' या सलम शब्दापासून त्याचा अर्थ शांती हाच आहे. नमाज हा शब्दही नमःह याचेच बहूवचनी सूचक रुप आहे. जैन दर्शनात 'अप्पा सो परमप्पा' तसेच इस्लाममध्ये 'अनलहक ला इलाहा इल्हा अना ' यातून इश्वरी उपदेश किंवा ग्रंथ असा अर्थ होतो. इस्लामातील अहिंसा मुलक विचार व पवित्रता प्रधान धार्मिक जीवन पध्दती जैन संस्कृतीचा अथवा भारतीय संस्कृतीच्या प्रभावातून दिसून येते. (१३)

कुराणतही जातककथा सारख्या, विष्णुशर्माच्या पंचतंत्रा-सारख्या, इसापनीतीच्या कथेसारख्या कथा असून त्यातून उच्च, उदात्त, सात्वीक तत्वांचा कथाव्दारे बोध केला आहे.

पुराणे व इतिहास यांचा जसा संबंध तसाच समाज व इतिहास संबंध, तसाच साहीत्य व इतिहास याचा संबंध सांगताना १० व्या मराठी जैन साहित्य संमेलनाचे उद्घाटक डॉ. धनागरे यानी साहित्य व इतिहास एकाच नाण्याच्या दोन बाजू असून इतिहासकारांनी वास्तुशास्त्र, लेणे औद्योगिक प्रगती व आपल्या प्राचीन स्वंतत्र असित्वाचा अधिक शोध घेण्याची गरज

त्यांनी भाषणातून व्यक्त केली. पुराणाविषयी विचार करणे म्हणजे मी माझ्या दृष्टीकोनातून मला प्राचीन भारताच्या स्वंतत्र अस्तित्वाचा शोध घेणे होय. (१४)

भरतक्षेत्रात भोगभूमीचा काळ म्हणजे तृतीय काळाचा अंत झाला. कर्मभूमीची रचना झाली. नगर रचनेला सुरुवात झाली. सर्वप्रथम आयोध्या नगरीची रचना झाली. कुलंकर नाभिराज आपल्या पत्नीसह अर्थात मरुदेवीसह राहू लागले. अश्याच एके दिवशी स्वर्गातून नगरीत सोन्याचा पाऊस पडू लागला. हे असे अतिशयोक्तीपूर्ण वर्णन कोणत्याही पुराणात येत असते. मरुदेवीला उत्तररात्री १६ स्वप्ने पडली. पती नाभिराजाला स्वप्नाचे फळ विचारले पती पत्नी सुसंवाद होतो. हा सुसंवाद म्हणजे भावी आयुष्याचे स्वप्न रंगवत असलेले दिसते. आशा, इच्छा, आकांशावर माणूस जगतो हे समाज व्यवस्थेच्या दृष्टीने महत्वाचे वाटते. (१५)

स्वप्नात ऐरावत, शुभ्र बैल, लक्ष्मी, दोन हत्ती, दोन पुष्पमाला, भुंगे, पौर्णिमाचा चंद्र, बालसूर्य, सूवर्णकलश, दोन सरोवरातील मासे, सुंदर तलाव, सागरावर उसळणाऱ्या लाटा, एक सोन्याचे सिंहासन, स्वर्गीय विमान, पृथ्वी भेदून आलेले विमान रत्नाच्या राशी, धुराविषयी अग्नी, मदोन्मत्त बैल, हे स्वप्न मरुदेवी नाभिराजास सांगते. व स्वप्नाचे फल

विचारते. तेव्हा नाभिराज असे उत्तर देतात की, ' तुला', ' मति', 'श्रूती ', 'अवधि ' ज्ञान असणारा पुत्र होणार. (१६)

मरुदेवीला स्वप्नाचे फल सांगताना नाभिराज 'देवी' असे आदरार्थी संबोधतात यावरुन समाजात स्त्रियांना आदराचे स्थान होते हे समजते, निदान तिचे कुंटूबात तरी मानाचे स्थान होते. मति, श्रूती, अवधि ज्ञानयुक्त मुलगा होणार हे ऐकताच मरुदेवी हर्षभरीत होते. प्रत्येक आईला आपला मुलगा श्रेष्ठ असावाच वाटतो तर मग मरुदेवीला का नाही आनंद वाटणार

पुराणातील अदभूत वर्णने अतिशयोक्तीपूर्ण वर्णने काल्पनिक असतात. जेव्हा मरुदेवीस पुत्र प्राप्ती होते. तेंव्हा आकाश निरभ्र झाले दिश्या उजाळल्या, कल्पवृक्ष फुलांचा वर्षाव करु लागले. स्वर्गात दुदुभीचा आवाज येऊ लागला. शीतल, मंद, मधुरवायु वाहू लागला. पृथ्वी रोमांचीत होऊन सागरलाटांशी खेळू लागली. आणि इंद्रासन कंप पावले. इंद्राची आज्ञा मिळताच सारा देव समूह स्वर्गातून निघाला. सौधर्म इंद्र-इंद्रायणी अयोध्या नगरीत लवाजम्यासह येतात. हे वर्णन अतिशयोक्तीपूर्ण असले तरी धार्मिक श्रध्दांचे दृढिकरण व्हावे हा हेतू पुराणाचा असतो. (१७)

वर्णन अतिशयोक्ती असले तरी तत्कालीन समाजाच्या श्रध्दा त्यातून व्यक्त होतात. एखादया भव्य जीवाच्या जन्माच्या वेळी पृथ्वीवर आनंद

देणाऱ्या घटना घडतात. यावर आजही श्रध्दा दिसून येते. त्याला दुसऱ्या शब्दात ' शुभशकून'ही म्हटले जाते.

अलिकडच्या काळात दूरदर्शनवर पुष्पदंत या जैन कविच्या काव्याची ओळख करुन दिली जाते. जीनसेनाचार्याइतकेच महत्वाचे कार्य पुष्पदंत कविने केले आहे. पुष्पदंतानी आदिपुराणाच्या आधाराने काही स्वतंत्र काव्य रचना केली आहे. उत्तरभारतात पुष्पदंताची काव्ये जैन मंदिरात नित्य पठनात आहेत. पुष्पदंत हे प्रातः स्मरणीय कवी म्हणून जैन परंपरेत मानतात. हिंदी साहित्यात तुलसीदासाचे काव्य जसे महत्वाचे तसेच जैनपंरपरेत पुष्पदंताच्या काव्याचे महत्व आहे.

पुष्पदंत कवी मान्यखेटचे भरत व त्याचा पुत्र नन्न याच्या आश्रयास राहत असे त्याला स्वतःच्या कवित्वाचा मोठा अभिमान होता. व्यक्तीमत्व तेजस्वी आणि प्रगल्भ होते. या कवीने स्वतःचा परीचय देखील दिला आहे. प्रथम ते शैव होते. नंतर जैन धर्मीय बनले. प्राकृत मधील 'चउपण्णमहापुरीस' व संस्कृतमधील 'त्रेषष्ट शलाका पूरुष चरित ग्रंथावलिप्रमाणेच अपभ्रंश भाषेत तिसटिठमहापुरीसगुणालंकारण या महाकाव्याची रचना केली याचे दोन खंड आहेत एक अदिपुराण व दुसरे उत्तर पुराण अदिपुराणात ऋषभनाथाचे चरित्र सांगितले असून उत्तर पुराणात तीर्थकंराच्या जीवनगांथाचा उल्लेख केला आहे. त्यात ६३ महापुरुषांच्या

कथा असून राम आणि कृष्ण यांचे जैन स्वरुप पहावयास मिळते. पुष्पदंताची काव्यशैली प्रवाहयुक्त असून विविध अलंकार रस तत्वार्थ निर्णयादि सर्व काही आहे. (१८)

पुष्पदंताचे काव्य स्वाभिमान, संघर्ष, त्याग या गुंणानी बहरले आहे. कोणताही भेदभाव लोक जीवनात ठेवला नाही. भेदाच्या पलिकडे त्यांचे विचार आहेत. आपणच आपल्या सुंदर जीवनात शत्रू बनतो अश्या विचाराने लोकभाषेचा वापर केल्याने ते लोकप्रिय व अविस्मरणीय आहेत.

आदिपुराणाचा अभ्यास करताना मुळ प्रत कोणाजवळ होती. अदिपुराणात पोटभेद कसे ? ते केंव्हा व कोणी केले? याविषयी मतभेद आहेत. त्यांच्या लेखनशैलीचा वापर केला गेला असला तरी दुसऱ्या लेखनशैली आपली होऊ शकत नाही. लेखनशैलीवर भोवतालची स्थिती व व्यक्तीवरीत संस्कार याचा प्रभाव असतो.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही पुराणाचा उल्लेख येतो. पुराणे सांगणाऱ्या पौराणिकाची नियुक्ती राजाकडून केली जात असे. याज्ञवाल्क्यस्मृतीने तर विद्या आणि धर्म यांच्या १४ स्थानात एक स्थान पुराणाचे मानले आहे. शुक्रनीतीही पौराणीक व पुराण उल्लेख येतो. ७ व्या शतकातील बाणभट्ट पुराणाची माहिती होती. हर्षचरित्रात 'पवमानपोक्त '

'पवमानप्रोक्त ' (वायूने सांगितलेल्या) पुराणाच्या पठनाचा उल्लेख आहे. अल्बेरुणी या अरबी प्रवाशाने १८ पुराणाची नामावली दिली.

पुराणामध्ये वेगवेगळया वंशावळी दिल्या असल्यामुळे भारताच्या इतिहासकाराला पुराणे फार महत्वाची ठरली . जैनाच्या २४ पुराणात २४ तीर्थकंर महात्म्याच्या कथा दिलेल्या आहेत.

पुराणावरुन धर्मातील कल्पना, एकेश्वरवाद, तत्वज्ञान, भक्ती, समजूती, चालिरीती, उत्सव, या सर्व अंगावर पुराणे प्रकाश टाकतात. (१९)

गेल्या शतकाच्या पूर्वाधात विल्सन यानी पुराणाचा पध्दतशीर अभ्यास केला. विष्णूपुराणाचे इंग्रजी भाषांतर प्रसिध्द केले. त्यात सविस्तर प्रस्तावना आहे. पाश्चात्य विव्दानाचे साहीत्यातील महत्वाच्या अंगाकडे लक्ष होते. या शतकाच्या पूर्वाधात पुराणातील ऐतिहासीक माहितीचे परिशिलन करुन पर्जिटर याने संशोधन केले. मौर्यराजाच्या माहितीसाठी विष्णुपुराण, गुप्तराजाच्या माहितीसाठी वायूपुराण महत्वाचे आहेत. हे अभ्यासकांना आढळून आले. (२०)

अर्थात पाश्चात्यानाही भारतीय पुराणाविषयीची आवड दिसून येते. भांडारकारानी पुराणे सर्व पारंपरिक संस्कृतीचे केंद्र आहे, असे म्हटले. वैज्ञाणिक विकास, सामाजिक व्यवस्थेचा प्रचार, दार्शानिक व्यवस्थेचा

आधार आणि संसारिक जीवनाचा मेरूदंण्ड धर्माच्या केंद्राशी सबंधीत आहे असा उल्लेख केला आहे. (२१)

समाजावर विव्दानांचा, परिसराचा प्रभाव असतो. मग तो समाज कोणत्याही राष्ट्रांचा असो.

झरतृष्टाची शिकवण प्रमाण मानणाऱ्या इराणी साहित्यीकांनी कालचक्राची कल्पना सांगितली आहे. १२ हजार वर्षाचे एक कालचक्र मानले आहे. त्याचे ४ सारखे कालखंड मानून प्रत्येक युग ३ हजार वर्षाचे धरलेले आहे. विश्वचक्राशी म्हणजेच गृहगोलाच्या स्थानांशी व गतीशी मानवी घडामोडीचा सबंध जोडण्यात आलेला आहे. झरतृष्ट्रप्रणीत धर्मात सामाजीक जीवनाची मूल्ये निश्चीत सांगितलेली आहे. त्या धर्माच्या आचारही समाजनिष्ठा व सामाजिक जबाबदारीची जाणीव उठून दिसणारी आहे. (२२)

प्राचीन ग्रीसमध्ये सर्वशक्तीमान ईश्वर, अनेक देवदेवता मानवी घडामोडीचे नियंत्रण करतात, देवदेवतांच्या योजनावर इतिहास घडतो. १०८०० वर्षाचे किंवा १८००० वर्षाचे एक युग असते, त्या युगाला काही एक युगधर्म असतो. माणसाची वागण्याची पद्धत ही कालवैशिष्टयाने ठरत असते हा सिध्दांत सांगण्यात आला आहे. चालूयुग ग्रीक इतिहासकारांच्या किंवा पुराणकराचे मते लोहयुग आहे. (२३)

कुराणात इस्लामी साहित्यात प्रसंगवशात जे इतिहासभाष्य आलेले दिसते, ते सगळे ईश्वरी इच्छेच्या पायावर आधारलेले आहे. मानवी जीवनात समाजाच्या राष्ट्राच्या जीवनात बदल घडतात, स्थित्यंतरे होतात, मानवी जीवनाच्या स्थित्यंतराचा इतिहासातील घडामोडींचा अर्थ लावण्याचा हाच मुळी इस्लाममध्ये नामंजुर आहे. तसा प्रयानही करणे चूक आहे, असे म्हटले आहे. (२४)

इस्लाम असो, ग्रीक असो, पारशी असो, हिंदू, जैन, बौद्ध असो, त्यांच्या पुराणकथांवर महापुरूषाचा प्रभाव असतो. जरूर वेगवेगळी मते असतील सृष्टी उत्पत्ती विषयी असतील पण समाजावर परिणाम होतो विव्दानांचा हे निश्चीतच होय.

सृष्टीच्या चराचरात असंख्यात जीव आहेत. प्रत्येक जीव कर्माच्या सामर्थ्यावर जन्माला येतो, कर्माप्रमाणेच फळ भोगतो, मग तो एकेंद्रियापासून ते पंचेन्द्रीयापर्यंतचे जीव असो. एक जीव दुसऱ्या जीवाचे काहीही करून शकत नाही. हे तत्व जैन धर्मात महत्वाचे मानले आहे.

एक जीव दुसऱ्या जीवाचे काहीही करू शकत नाही हे तत्व असले तरी आत्मदीप प्रज्वलित करण्यासाठी, उपादान असले तरी कुणाची तरी प्रेरणा निमित्तही आवश्यक आहेच, कुणाचा तरी आदर्श समोर हवाच.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

'महाजनो येन गतःस पन्थः' जैन धर्माने निःसंदिग्धपणे त्रेसष्ट महापूरूषांना आदर्शभूत मानले आहे. हे महापुरूष, महात्मे दीपज्योतीप्रमाणे अंधारातून प्रकाशाकडे नेण्यास समर्थ आहेत . (२५)

पुराणात मग ते कोणत्याही असो, त्यात शृंगार वर्णने, वैभवाचे वर्णन असते. शृंगाराबरोबर वीर रसांचा परिपोष ग्रंथात सर्वत्र मिळतो, पण त्याची परिणती मात्र शांत-वीतराग रसातच होते. शृगांराची आसक्ती कमी झाली की, मग तेच शृंगार विलास बीभीत्स किळसवाणी वाटू लागतात. त्याग केल्याशिवाय मुक्तीमार्ग प्रशस्त होत नाही. हा जैन धर्माचा मूळ सिध्दांतही पुराणातून सांगितला जातो. (२७)

भगवान महावीराचा दुभाषी गौतमगणधर यांनी पुराण जसे सांगितले तसेच पुराणकर्ते आचार्य कथन करतात. आचार्य रविषेण यांनी पद्मपुराणात रामचरित्राबद्दल जशा गोष्टी घडल्या तशाच सांगितल्या आहेत असे म्हणतात. ते पुढे म्हणतात "अशा महापुरुषांचे चरित्र स्तवन केल्याने पाप तर दूर होतेच पण विज्ञानाचीही वृध्दी होते." अशी पुराणे देशाचा प्राचीन इतिहास ठरवितात. अशा पुराणात ऋषभनाथासारख्या , रामासारख्या महापुरुषांच्या लोक जीवनाचा आदर्श असतो.

रामायणकार वाल्मिकींनाही जो कोणी या लोकांत बलवान धर्मज्ञ सत्यवाद दृढवृत्ती समस्त जीवांचा हितकार्य असेल त्यांचे चरिञ श्रवण करण्याची इच्छा नारदापुढे व्यक्त केली होती. (२८)

पुराणाची रचना जरी आठव्या, नवव्या शतकात केली असली तरी, त्यामध्ये प्राचीन तम पौराणीक परंपरेचा समावेश आढळतो. शेवटचे तीर्थंकर महावीर यांच्या जीवन चरिञाबरोबरच महावीरांच्य समकालीन वैशालीचा राजा चेतक, मगध नरेश, श्रेणिक, बिंबीसार आदि पुराणांचा ऐतिहासीक दृष्टया महत्वाचे आहेत.

कांही लोकांचे असे मत आहे की, पुराणातील अंश पुर्वोक्त ारंपरेने प्रभावित झाला आहे. असे असले तरी आश्चर्य वाटायचे कारण नाही, कारण इतिहास काळातील श्रमण व वैदीक परंपरा, क्षेञ व काल या दृष्टीने बरोबरीने विकसीत होत आली आहेत. दोन्ही परंपरेत सामाजिक व लोक जीवनाची सारख्या समस्या दिसून येते. दोन्ही परंपरेत आपापल्या वैशिष्ठयाचा प्रभाव निर्माण केल्याचे स्पष्ट दिसते. तर मग वैदिक परंपरेतील यज्ञ, क्रियाकाळ व वर्णाश्रमाची कठोर कार्यवाही का चालत आली नाही ? असा प्रश्न पडतोश्रमण संस्कृतीचा 'अहिंसा ' सिध्दात व जीवन माञामध्ये समान रुपाने परमात्मवादाच्या दृष्टिने केलेला विचार

आजही टिकून आहे. सामाजिक आचरणात वर्णभेदात कधीही कठोर कार्यवाही केली नही. (२९)

जैनाचार्याने वरील बाबी संबधीत स्पष्टच उल्लेख केला आहे.

" सर्व एव हि जैनानां प्रमाणं लौकिको विधिः ।

यत्र सम्यत्त्वहानिनं यत्र ना व्रत दूषणम् ।।"

अर्थात लोकप्रचलीत सर्व व्यवहार प्रमाण रुपाने जैनाला मान्य आहेत. ज्यामुळे सम्यकत्व अर्थात जड व चेतन या मौलिक भेदाच्या मान्यतेला हानी पोचणार नाही. (३०)

कोणत्याही धर्माचा इतिहास उत्कर्ष व पतन प्रचार व ऱ्हास याचा इतिहास होतो. परंतू त्याचा स्वतत्र इतिहास होऊ शकत नाही. धर्म जीवनाच्या नैतिक व्यवहाराची परिलक्षीत शैली आहे. धर्म स्थापन होतो तो महापुरुषाच्या कथनातून, धर्म संस्थापनेचे दोन उपाय आहेत. १) हृदय परिर्वन २) दण्डभय. धर्मनायक प्रथम स्वतः परिवर्तन करतात त्याच्यावर उपाय करतात. लोक नायक तो उपाय उपयोगात आणतात. ज्यानी आपले जीवन धर्ममय बनविले. जे दुसऱ्याला उपदेश देतात. ते धर्मनायक होत. (३१)

ऋषभदेवानी कच्छ, महाकच्छ राजाच्या बहिणी यशस्वती व सुनंदा यांच्याशी नाभिराज्यांच्या सांगण्यावरुन विवाह केला. येथे वडीलधाऱ्यांना

कुटुंबाविषयी निर्णय घेण्याचा अधिकार होता हे दिसते. ऋषभनाथांना शंभर मुले व दोन मुली झाल्या. बहुपत्नीत्वाची प्रथा राजघराण्यातील कुटुंबात दिसते. पुरुष एकापेक्षा अधिक स्त्रीयांशी विवाह करीत असत.

ऋषभदेवांनी आपल्या कुटुंबातील सर्वांना शिक्षण देऊन जनतेच्या कल्याणाकडेही अधिक लक्ष दिले होते. सुधारणा घरा पासून केल्यास समाजावर प्रभाव पडतो. अनेक जनकल्याणकारी विद्या ऋषभदेवांनी मुलांना शिकविल्या. (३२)

ऋषभदेवांनी आपल्या दोन मुलींना जो उपदेश केला तो ही समाज व्यवस्थेच्या दृष्टिने किती महत्वाचे आहेत. हे समजते ब्राम्ही व सुंदरीला ते म्हणतात ,"सुकन्यानो हे तुमचे अद्वितीय सौंदर्य ,अनुपमशील विद्येने विभुषीत केले तरच जीवनाचे सार्थक होईल. विद्या चितांमणी रत्न होय, विद्येपासूनच धर्म अर्थ काम मोक्ष या चार पुरुषार्थाची प्राप्ती होते ." (३३)

हा उपेदश ऐकताच मुलींनी वर्णमाला व अंकशास्त्राचे शिक्षण घेतले अध्यात्मही जाणून घेतले परिणामी त्या अविवाहीत राहिल्या. अर्थात ऋषभनांथानी विवाहीत जीवनात प्रवेश करायचा किंवा नाही, हा निर्णय त्यांच्यावरच सोपवला होता. म्हणजेच समाजात स्त्रियांना अविवाहीत किंवा विवाहीत राहण्याचे स्वातंत्र्य होते हे स्पष्टे होते.

विद्वान विदूषी स्त्रिया संसाराची जबाबदारी न घेता ज्ञानाच्या क्षेत्रात अधिक प्रगती करण्याचा निर्णय त्या घेऊ शकत होत्या असे दिसते.

ब्राम्ही सुंदरीला ऋषभनांथानी स्वतः विद्या पारंगत केले यावरुन वडील, मुली यांच्यातील संबंध गुरु शिष्याचे, प्रेमाचे, आदराचे होते. ऋषभनाथानी स्वगृहीच त्यांना विद्या प्रदान केली कारण ते स्वतःच विद्वान होते तस तर मुलींनाही गुरुगृही शिकण्याची परवानगी होती. मुलीवरही उपनिती संस्कार केले जात होते.

तत्कालात विविध विद्या कला होत्या. हे स्पष्ट होते. जगात ज्या विद्येने जीवन सुखमय बनते त्या विद्या ऋषभ नाथांनी मुलांना दिल्या यावरुन शिक्षणाची उपयुक्तता महत्वाची होती. अभ्यासक्रमच असा होता की, व्यवहार उपयोगी शिक्षण दिले जात होते. ऋषभदेवांनी भरताला नृत्य शास्त्र, वृषभसेनला गंधर्वविद्या, अनंतविजयाला चित्रकला, इतर मुलांना स्थापत्य कला, बाहुबलीस कामशास्त्र आयुर्वेद, रत्न परिक्षा, अश्वपरिक्षा, गजपरिक्षा या विद्या दिल्या यावरुन व्यक्तिपरत्वे भिन्न विद्या दिली म्हणजेच व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणी प्रमाणे कुवतीनुसार, क्षमतेनुसार, अवडीनुसार शिक्षण दिले जात होते. (३४)

स्त्रीपुरुषांना निसर्गनियमाने मुले तर होतीलच त्यात विशेष नाही, पण मुलांना ज्ञान देऊन विद्या शिकवून उत्तम जीवन कसे जगाव याचे

पाठ दिले जात होते. मुलांसारखे मुलींना सुशिक्षीत बनविणे आवश्यकच नाही. तर प्रथम कर्तव्य ऋषभनाथांनी मानले [३५]

याचाच अर्थ स्त्रियांना समाजात शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य होते. स्वत: विव्दान असणा-या व्यक्ती किंवा माणसे शिक्षणाचे महत्व जाणतात. म्हणूनच स्वत: विव्दान असणाऱ्या वृषभनाथांनी मुलींना शिक्षण दिले. मुलींना शिक्षण दिल्यास कुटूंबाचे व पर्यायाने समाजाचे कल्याण होईल याची जाणीव ज्ञानीना होती हे दिसून येते.

समाजव्यवस्थेवर कुटुंबातील प्रत्येक घटकांचा परिणाम होत असतो. एक आदर्श कुटुंब समाजाची पर्यायाने राष्ट्राची संस्कृती निर्माण करत असते हेच वृषभनाथाच्या कुटुंबाविषयी म्हणता येईल.

जैन लोक केवल त्यागमार्गीच आहेत. असा गैरसमज आहे. सर्व तीर्थकंर हे क्षत्रिय कुलोत्पन्न असुन वृत्तीने ते क्षत्रियत्व होते. गृहस्थावस्थेत सुंदर शासन व्यवस्थेचा आदर्श जगापुढे ठेवतात. जैन राजनिती शासनसंस्था याचा अभ्यास केला तर भरत बाहुबली वृषभ हे वृषभनाथाचे पुत्र महान पराक्रमी चक्रवर्ती, अजिंक्य असे शूरवीर होते. हे आदिपुराणावरून दिसून येते. सर्वश्रेष्ठ शासन व्यवस्था वृषभदेवांनी केली. दंडनितीचा वापरही केला. भरत चक्रवर्तीने तुरूंगवास, अवयव छेदन या शिक्षांची सुरूवात केली. यावरून राजा सर्वोच्च अधिकारी शासन प्रमुख,

न्यायप्रमुख होता. समाजात शांतता सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी गुन्हेगाराना शिक्षा देणे गरजेचे होते. राजा महाक्रमी, निर्व्यसनी, लोकप्रिय असावा अशी अपेक्षा होती. राजेपद वंशपरंपरागत होते. (३६)

भगवान वृषभदेवांनी केवळ कौटुंबिकच जबाबदारी संभाळली नाही वर भरतखंडाचे साऱ्या जगाचे ते गुरू जबाबदार व प्रजेचे पितामह होते.

सागरापर्यंत लांबवर पसरलेल्या पृथ्वीचा कारभार पहात असताना बरेच दिवस गेले. एकदा सभा मंडपात ते सिंहासनावर विराजमान असताना निलांजनाचे आकर्षक नृत्य चालू होते. नृत्य चालू असतानाच नृत्यकलेतील अभिनव प्रकारासारखे ती पृथ्वीवर पडली. ही मृत्यूची पहिलीच घटना पहाताच वृषनाथांची ज्ञानचेतना जागी झाली. निरंजनेचे शरीराप्रमाणे सारे भोगोपभोग विनाशी असा विचार येताच त्यांनी भेद ज्ञान जाणले व राज्य त्याग करून तपश्चरण केले, मोक्षप्राप्ती करून घेतली. (३७)

संन्यासश्रमात प्रवेश करताना राज्याची जबाबदारी वृषभदेवांनी ज्येष्ठ पुत्र भरतावर सोपवली. व शाश्वत सुखासाठी संसाराच्या मोहापासून ते विरक्त झाले.

ऋषभेदवानी जेष्ठ पुत्र भरतास राज्यकारभाराची जबाबदारी सोपवली राज्याभिषेक सोहळा मोठया थाटामाटात पूर्ण झाला. भरत चक्रवर्तींना एकाच वेळी तीन बातम्या समजल्या, धर्माधिकाऱ्याने

ऋषभेदवाना केवलज्ञान झाल्याची बातमी दिली. आयुध शाळेच्या रक्षकांनी ' चक्ररत्न ' प्रकट झाल्याची बातमी दिली आणि कंचुकीने पुत्रजन्माची बातमी दिली. प्रथम कोणता उत्सव साजरा करावा ? हा प्रश्न भरतापुढे पडला. धर्म पुरुषार्थ, अर्थ पुरुषार्थ व काम पुरुषार्थ या तिन्ही फलाचा उत्सव साजरा करणे मनात आहे. त्यावेळी सर्व प्रथम त्यांनी धर्म कार्य हाती घेतले, यातून ऋषभदेवानी जे बीज पेरले ते उगवले, या म्हणीची प्रचिती येते.

भरताने आपल्या पराक्रमाने षट्खंड जिंकले. यावरुन भरताचे सैन्य किती पराक्रमी होते. व नेतृत्व किती महत्वाचे असते हे कळते.

भरत चक्रवर्तीना चक्ररत्नाच्या मदतीने सर्व खंडाना जिंकता आले. शस्त्रागारातील चक्ररत्न हे अमोघ शस्त्र होते. यामुळे राजाने अनेक राजानी मांडलिकत्व पत्करले. भरताची खंडसिमा वाढत गेली. चहुदिशेने विजय मिळवून परतत असतांना गांधर्व देशीय बंधू बाहुबलीस जिंकण्याचे राहून गेले. याची कल्पना प्रधान मंत्र्यानी दिली. बंधू असल्या कारणाने युध्द करण्यापेक्षा मांडलीकत्व पत्करण्या बद्दल निरोप पाठविला. ऋषभनाथाचाच पुत्र तो बाहुबली असल्याने, तो मांडलिकत्व पत्करण्यास तयार झाला नाही. उलटपक्षी युध्दाला तयार झाला. भरतास हा निरोप रुचला नाही. युध्द करुन बाहुबलीस जिंकावे हेच अंतिम ठरले.

शस्त्रागारातील 'अमोघ अस्त्र म्हणजे चक्ररत्न ' स्वकीयावर चालत नाही. एवढेही भरताला कळाले नाही. आमकासमोर दोघांचेही सैन्य उभा राहिले. घणघोर

युध्द होणार असे वाटत होते. युध्दाने सैन्य हानी मोठया प्रमाणात होणार हेही ठरले होते. याबद्दल पुरोहितांमध्ये चर्चा झाली. सैन्यहानी टळण्यासाठी दोंघाचीही समजूत काढून दोघांनीच युध्द करावे असे ठरले. दोघांनीही ते मान्य केले. त्याप्रमाणे भरतचक्रवर्ती व बाहुबली यांच्यामध्ये युध्द ठरलेल्या संकेताप्रमाणे जलयुध्द, दृष्टीयुध्द, व मुष्ठीयुध्दास सुरुवार्ते होऊन बाहुबली हा बाहुबलीच ठरला.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रकरण ३

संदर्भ सुची

१. आपटे वि. गो., ' पाऊलवाटा', गोकुळ मासिक, प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पृ. क्र. ३
२. कित्ता, पाऊलवाटा', पृ. क्र. १५
३. पंडिता सुमतीबाई शहा, ' पूर्णार्घ्य', पूर्णार्घ्य प्रकाशन, (जैन ज्ञानकोश) पी. एस. विद्यापीठ ट्रस्ट प्रकाशन, सोलापूर. पृ. क्र. ५९
४. डॉ. पन्नालाल जैन, 'आदिपुराण', भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, नई दिल्ली. पृ. क्र. २५
५. देशपांडे वि. वा., 'भारतीय तत्वज्ञानाचा ख्रिस्ती विचारावरील प्रभाव', संवाद प्रकाशन, मुंबई, पृ. क्र. ६८
६. कित्ता, 'भारतीय तत्वज्ञानाचा ख्रिस्ती विचारावरील प्रभाव', पृ. क्र. ७०
७. रविद्रनाथ बल्लोळ, 'जैन धर्माची प्राचीनता व अल्पसंख्यांक दर्जा', श्री. बा. भु. पाटील, ग्रंथ प्रकाशन मंडळ, 'सांगली. पृ. क्र. ९
८. कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. २९८
९. कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ३००
१०. श्री. पं. कैलाशचंद्रजी शास्त्री , 'जैनधर्म', लालचंद हिराचंद जैन संस्कृती संरक्षक संघ, सोलापूर. पृ. क्र. १३
११. कित्ता, 'जैनधर्म', पृ. क्र. १४
१२. भीसीकर , अक्कोळे, संगवे, संपादक मंडळ, 'सन्मती' , सन्मती मुद्रणालय, बाहुबली , जुलै १९९६, पृ. क्र. ५
१३. कित्ता, 'सन्मती' , पृ. क्र. ७
१४. कित्ता, 'सन्मती' , पृ. क्र. ११
१५. आळंदकर ज.ज्ञ. , 'भगवान ऋषभदेव', जैन संस्कृती संरक्षक मंडळ, सोलापूर, पृ. क्र. ५२
१६. कित्ता, 'भगवान ऋषभदेव', पृ. क्र. ५३
१७. कित्ता, 'भगवान ऋषभदेव', पृ. क्र. ५६
१८. कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. ३०५
१९. डॉ. सौ. सिंधू डांगे, 'भारतीय साहित्याचा इतिहास', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ, मंगल प्रकाशन, नागपूर. पृ. क्र. २७७
२०. कित्ता, 'भारतीय साहित्याचा इतिहास', पृ. क्र. २७८
२१. भाण्डारकर आर. जी. महेश्वरी प्रसाद, 'भारतीय विद्या प्रकाशन', दिल्ली, प्रस्तावना.
२२. सदाशिव आठवले, 'इतिहासाचे तत्वज्ञान', म. श. साठे. चिटणीस पाक्ष पाठशाला मंडळ, वाई, पृ. क्र. २७
२३. कित्ता, 'इतिहासाचे तत्वज्ञान', पृ. क्र. २९
२४. कित्ता, 'इतिहासाचे तत्वज्ञान', पृ. क्र. ३३

२५. आचार्य रविषेण कृत, 'पद्मपुराण' , पद्मप्रकाशन, पृ. क्र. ३
२६. कित्ता, 'पद्मपुराण', पृ. क्र. ४
२७. कित्ता, 'पद्मपुराण', पृ. क्र. ५
२८. कित्ता, 'आदिपुराण' पृ. क्र. १
२९. कित्ता, 'आदिपुराण' पृ. क्र. ३
३०. कित्ता, 'आदिपुराण' पृ. क्र. ४
३१. बलभद जैन, 'जैन धर्म का प्राचीन इतिहास', केशरीचंद्र चावलवाले, दिल्ली, पृ. क्र. ३
३२. कित्ता, 'आदिपुराण' पृ. क्र. २६
३३. कित्ता, 'भगवान ऋषभदेव', पृ. क्र. ६५
३४. कित्ता, 'भगवान ऋषभदेव', पृ. क्र. ६६
३५. कित्ता, 'भगवान ऋषभदेव', पृ. क्र. ६७
३६. कित्ता, ' पूर्णार्घ्य', पृ. क्र. १५
३७. कित्ता, 'भगवान ऋषभदेव', पृ. क्र. ६७